# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# मोशी ग्रामस्थांच्या न्याय मागण्यांसाठी ग्रामस्थांसह महापौर रवि लांडगे यांचा पाठपुरावा..!

## दुर्घटनाग्रस्तांना न्याय, दोषींवर कठोर कारवाई आणि मोशीतील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प परिसरात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेनंतर नागरिकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता, परिसरातील सुरक्षिततेचे प्रश्न आणि ग्रामस्थांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने आज पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांच्या पुढाकाराने मोशी ग्रामस्थांची महत्त्वपूर्ण बैठक पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत पार पडली.



बैठकीमध्ये मोशी ग्रामस्थांनी दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा सविस्तर आढावा मांडत, मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळणे, दोषींवर कठोर कारवाई, परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री, कचरा डेपोमुळे होणारे आरोग्यविषयक व पर्यावरणीय दुष्परिणाम तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक प्रश्नांबाबत आपल्या भावना आणि मागण्या स्पष्टपणे मांडल्या.

ग्रामस्थांनी प्रत्येक मागणीची सखोल मांडणी करत ही घटना केवळ एका दुर्घटनेपुरती मर्यादित नसून नागरिकांच्या सुरक्षितता, पर्यावरण आणि प्रशासनावरील विश्वासाशी संबंधित अत्यंत गंभीर बाब असल्याचे नमूद केले. मोशीकरांच्या न्याय्य मागण्यांवर कोणतीही तडजोड होणार नसून प्रशासनाने याकडे सर्वोच्च प्राधान्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व मागण्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागप्रमुखांना आवश्यक त्या कार्यवाहीचे निर्देश देण्याबरोबरच मोशी ग्रामस्थांनी उपस्थित केलेले प्रश्न टप्प्याटप्प्याने आणि प्राधान्यक्रमाने मार्गी लावण्यात येतील, असे आश्वासन दिले. दुर्घटनेशी संबंधित प्रकरणात प्रशासन कोणतीही दिरंगाई करणार नसून आवश्यक ती सर्व प्रशासकीय कार्यवाही नियमांनुसार गतीने केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, "मोशीतील प्रत्येक नागरिकाची वेदना मी जवळून अनुभवली आहे. दुर्घटनेत जीव गमावलेल्या कुटुंबांना न्याय मिळवून देणे, दोषींवर कठोर कारवाई करणे आणि मोशीकरांचे प्रत्येक न्याय्य प्रश्न मार्गी लावणे, ही माझी नैतिक आणि लोकप्रतिनिधी म्हणून असलेली जबाबदारी आहे. मोशीकरांना दिलेले आश्वासन पूर्ण होईपर्यंत माझा पाठपुरावा सातत्याने सुरू राहील. नागरिकांचा विश्वास आणि सुरक्षितता यापेक्षा मोठे काहीही असू शकत नाही."

बैठकीत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, प्रभाग अध्यक्षा अर्चना सस्ते, नगरसदस्या सारिका गायकवाड, सारिका बोऱ्हाडे, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, माजी नगरसदस्य धनंजय आल्हाट, मंदा आल्हाट, सामाजिक कार्यकर्ते राजेश सस्ते, उदय गायकवाड, निलेश बोऱ्हाडे, नितीन बोऱ्हाडे तसेच मोशी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोशी ग्रामस्थांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नावर सकारात्मक चर्चा झाली असून, महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी समन्वयाने तातडीने आवश्यक कार्यवाही करून प्रलंबित कामे आणि न्याय्य मागण्या शक्य तितक्या लवकर मार्गी लावण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास ग्रामस्थांना दिला.

### प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या..

- » दुर्घटनेस जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी, यंत्रणा व कंपनीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.
- » मृतांच्या कुटुंबियांना भरीव आर्थिक मदत तातडीने वितरित करण्यात यावी.
- » जखमी नागरिकांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च महापालिका व शासनामार्फत उचलण्यात यावा.
- » पीडित कुटुंबातील एका पात्र सदस्यास शासकीय/महापालिका सेवेत नोकरी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.
- » मोशी कचरा डेपो बाबत निर्णय घेऊन परिसरातील नागरिकांना कायमस्वरूपी दिलासा देण्यात यावा.
- » परिसरातील आरोग्य, पर्यावरण आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रश्नांवर दीर्घकालीन उपाययोजना राबविण्यात याव्यात.
- » ग्रामस्थांनी मांडलेल्या सर्व प्रलंबित नागरी सुविधांशी संबंधित प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात यावेत.

# पीएमआरडीएत मनुष्यबळाचा तुटवडा; 61 टक्के पदे रिक्त, विकासकामांच्या गतीवर परिणाम

## 407 मंजूर पदांपैकी केवळ 157 कर्मचारी कार्यरत; रिंग रोड, नगररचना आणि पायाभूत प्रकल्पांसाठी रिक्त पदे भरण्याची गरज

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेशाचा झपाट्याने विस्तार, नव्या रस्त्यांचे जाळे, नगररचना, गृहनिर्माण प्रकल्प आणि विविध पायाभूत सुविधा उभारण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या पीएमआरडीएला सध्या मनुष्यबळ टंचाईचा सामना करावा लागत आहे. मंजूर पदांच्या तुलनेत 61 टक्के पदे रिक्त असली, तरी उपलब्ध अधिकाऱ्यांच्या कार्यक्षम नियोजनाद्वारे कामांची गती कायम ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे.




अलीकडेच काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्याने कार्यरत अधिकाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या आल्या असल्या, तरी कामावर याचा परिणाम होऊ नये यासाठी नियोजन केले जात आहे. त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांची कसरत होत असल्याची माहिती समोर आली आहे. पीएमआरडीएच्या उपलब्ध माहितीनुसार, प्राधिकरणात एकूण 407 पदे मंजूर आहेत. मात्र, सध्या केवळ 157 कर्मचारी व अधिकारी कार्यरत असून, 250 पदे रिक्त आहेत. परिणामी, अनेक विभागांमध्ये एकाच अधिकाऱ्याकडे दोन किंवा अधिक विभागांचा कार्यभार देण्यात आला आहे. यामुळे फाईल मंजुरी, प्रशासकीय निर्णय, विकास आराखडे आणि विविध प्रकल्पांच्या प्रक्रियेत काही प्रमाणात वेळ लागत आहे.

वर्गनिहाय आकडेवारी पाहता, वर्ग 'अ'मधील 82 मंजूर पदांपैकी 47 पदे भरलेली असून, 35 पदे रिक्त आहेत. वर्ग 'ब'मध्ये 110 पैकी केवळ 35 पदे भरलेली असून, 75 पदे रिक्त आहेत. वर्ग 'क'मध्ये 165 पदांपैकी 30 पदांवर कर्मचारी कार्यरत असून 135 पदे रिक्त आहेत. वर्ग 'ड'मध्ये 50 पैकी 45 पदे भरलेली असून, पाच पदे रिक्त आहेत. लिपिक-टंकलेखक संवर्गात 70 पदे मंजूर असताना प्रत्यक्षात दोन कर्मचारी कार्यरत असल्याने कार्यालयीन कामकाजावर सध्या ताण जाणवत आहे.

दरम्यान, या परिस्थितीत लवकरच मोठा दिलासा मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या 61 नव्या लिपिकांची नियुक्ती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, सध्या त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरू आहे. हे कर्मचारी लवकरच सेवेत रुजू होणार असल्याने लिपिक संवर्गातील रिक्त पदांचा प्रश्न सुटणार असून, कार्यालयीन कामकाजाचा वेग आणखी वाढणार आहे.

# कचरा प्रश्न पेटला : मोशी परिसरातील नगरसेवकांचा "एल्गार"

## मोशी कचरा डेपोवर भोसरी मतदारसंघाशिवाय कचरा नको; पिंपरी, चिंचवड मतदारसंघातील कचरा टाकण्यास तीव्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आता या विषयावर मोशी परिसरातील लोकप्रतिनिधींनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मोशी कचरा डेपोवर केवळ मोशी अर्थात भोसरी विधानसभा मतदारसंघातीलच कचरा टाकावा आणि पिंपरी व चिंचवड विधानसभा मतदारसंघातील कचरा येथे डंप करू नये, अशी ठाम मागणी नगरसेवक निखिल शिवाजी बो-हाडे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे



पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिलेल्या निवेदनात बो-हाडे यांनी म्हटले आहे की, मोशी कचरा डेपोवर ८ जुलै २०२६ रोजी कचऱ्याचा डोंगर वेस्ट टू एनर्जी प्रकल्पावर कोसळून भीषण दुर्घटना घडली. या घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला असून, अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतरही शहरातील वाढत्या कचऱ्याचा भार मोशीवरच टाकण्याचा प्रयत्न होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १९८२ पासून शहरातील कचऱ्याची विल्हेवाट मोशी येथे लावली जात असून, आज शहराची लोकसंख्या ४० लाखांच्या घरात पोहोचली आहे. शहरात दररोज सुमारे १,५०० मेट्रिक टन कचरा निर्माण होत असून, त्यातील मोठा हिस्सा मोशी कचरा डेपोवर जमा होतो. त्यामुळे परिसरातील नागरिकांना आरोग्य, पर्यावरण आणि सुरक्षिततेच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

मोशी परिसरातील नागरिकांनी गेली अनेक दशके शहराचा कचरा सहन केला असून, आता अन्य मतदारसंघातील कचरा मोशीत आणण्याचा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, असा इशारा देखील निवेदनातून देण्यात आला आहे. पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघांसाठी स्वतंत्र व पर्यायी कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

महापालिका प्रशासनाने अन्य मतदारसंघांतील कचरा मोशी येथे टाकण्याचा निर्णय घेतल्यास स्थानिक नागरिक, सर्व नगरसेवक आणि ग्रामस्थांच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा बो-हाडे यांनी दिला आहे. प्रसंगी कचरा डेपोच्या प्रवेशद्वारांवर ठिय्या आंदोलन करून निषेध नोंदविण्यात येईल, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अधिकच चिघळला असून, आगामी काळात हा मुद्दा राजकीय आणि सामाजिक स्तरावर अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. महापालिका प्रशासन या मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

> **"आमची भूमिका स्पष्ट आहे. मोशी कचरा डेपो हा भोसरी मतदारसंघाच्या हद्दीत असून, येथील नागरिकांनी पुरेसा त्याग केला आहे. पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघांसाठी स्वतंत्र आणि शाश्वत कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणे ही महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. मोशीकरांच्या आरोग्याशी, पर्यावरणाशी आणि सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. प्रशासनाने आमच्या मागण्यांची दखल घेतली नाही, तर स्थानिक नागरिक, ग्रामस्थ आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींसह लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल. मोशीकरांच्या सहनशीलतेचा अंत झाला असून, आता न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील."**
>
> **- निखिल बो-हाडे, नगरसेवक, भाजपा, मोशी.**

# मुख्यमंत्री फडणवीसांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरीत 302 जणांचे रक्तदान

## पिंपरी विधानसभेत आमदार अमित गोरखे यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी विधानसभा मतदारसंघात आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड येथील नोवेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदेश भाजपचे अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.




उद्घाटन प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना रवींद्र चव्हाण म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न करता समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची संकल्पना अत्यंत प्रेरणादायी आहे. रक्तदानासारख्या उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते. आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी मतदारसंघात आयोजित केलेले हे रक्तदान शिबिर सामाजिक बांधिलकी जपणारे आणि तरुणांना सेवाभावाची प्रेरणा देणारे आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो आणि सार्वजनिक जीवनातील लोकप्रतिनिधींनी समाजहिताला प्राधान्य दिल्याचे समाधान वाटते."

सकाळी ९.०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर रवींद्र चव्हाण यांनी रक्तदात्यांशी संवाद साधत त्यांच्या उत्साहाचे कौतुक केले आणि अधिकाधिक नागरिकांनी रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

या प्रसंगी भाजप प्रदेश महामंत्री राजेश पांडे, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, राजेश पिल्ले, सभापती संजय नाना काटे, सभापती कैलास कुटे, नगरसेवक तुषार हिंगे, नगरसेवक शीतल शिंदे, नगरसेवक कुशाग्र कदम, नगरसेविका अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, शैलजा मोरे, मधुरा शिंदे, प्रसाद शेट्टी, अमित बाबर, नेताजी शिंदे तसेच पिंपरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार अमित गोरखे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे भव्य रक्तदान शिबिर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उत्साहात पार पडले. शिबिराला नागरिकांचा, विशेषतः युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे ३०२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. मोठ्या प्रमाणात झालेल्या सहभागामुळे हे शिबिर पिंपरी-चिंचवड शहरातील उल्लेखनीय आणि भव्य रक्तदान उपक्रमांपैकी एक ठरत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी विधानसभा मतदारसंघातील ७ प्रभागांमध्ये अशाच प्रकारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच नगरसेविका अनुराधा गोरखे यांनी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक आणि आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानत, समाजहितासाठी अशा उपक्रमांची परंपरा पुढेही सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कोट्यवधींचा खर्च; ड्रेनेज कामांचा हिशेबच महापालिकेकडे नाही

## प्रशासकीय काळातील नवीन ड्रेनेज व पावसाळी वाहिन्यांची माहिती संकलनात असल्याचे उत्तर; 557 कोटींच्या नव्या तरतुदीवरही प्रश्नचिन्ह

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कार्यक्षम कारभाराची सर्वत्र चर्चा होत असताना तेथे कशा पद्धतीने आंधळा कारभार चालतो, याचे आणखी एक उदाहरण समोर आले आहे. प्रशासकीय काळात महापालिका हद्दीत किती किलोमीटर नवीन ड्रेनेज, पावसाळी लाइन टाकली, त्यावर किती खर्च झाला आणि प्रति किलोमीटर सरासरी खर्च किती याची माहिती पालिकेकडेच उपलब्ध नाही.



नगरसेवकांनी याबबात विचारलेल्या प्रश्नाला प्रशासनाने याची माहिती व्यापक स्वरूपाची असल्याने संकलन करण्यात येत असल्याचे उत्तर दिले आहे. साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय काळातील कामांची मूलभूत माहिती उपलब्ध नसणे ही धक्कादायक बाब आहे. पालिकेच्या अंदाजपत्रकातील आकडेवारीनुसार या काळात दरवर्षी सरासरी ३५० ते ४०० कोटींचा खर्च झाला आहे.

मात्र, हा पैसा कोठे आणि कधी खर्च झाला याची माहिती व्यापक स्वरूपाचे असल्याचे सांगत वेळ मारून नेण्यात आली आहे. मार्च २०२२ ते जानेवारी २०२६ या कालावधीत पालिकेच्या निवडणुका झाल्या नसल्याने पालिकेवर प्रशासकांची नियुक्ती झाली होती. भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका मानसी देशपांडे यांनी जुलैच्या पालिका सभेसाठी उपस्थित केलेल्या प्रश्नोत्तरावेळी पालिकेच्या हद्दीत सध्या २,६५० किलोमीटर ड्रेनेज आणि ३५० किलोमीटर पावसाळी लाइनचे जाळे आहे.

तसेच शहराचे क्षेत्रफळ ५०६ चौरस किलोमीटर असल्याची माहिती दिली आहे. मात्र, प्रशासकीय काळात या जाळ्यात किती वाढ झाली, किती नवीन लाइन टाकल्या आणि त्यासाठी किती खर्च झाला यांच्यासह मंजूर निधी, निविदा रक्कम आणि प्रत्यक्ष खर्चाचा तुलनात्मक तक्ताही देशपांडे यांनी मागितला होता. मात्र, त्याबाबत प्रशासनाने माहिती संकलित केली जात असल्याचे सांगितले आहे.

२०२६-२७ च्या अंदाजपत्रकात मलनिस्सारण विभागासाठी ५३०.९२ कोटी आणि पावसाळी लाइनच्या कामांसाठी २६.३० कोटी, अशी एकूण ५५७.२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महापालिका निवडणूका संपल्यानंतर या विभागास मोठ्या प्रमाणात निधी दिला असून या खर्चाचा तरी हिशेब प्रशासन ठेवणार का असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### प्रशासनाकडेच मूलभूत माहिती नाही

» महापालिकेच्या प्रशासकीय काळात शहरात किती किलोमीटर नवीन ड्रेनेज आणि पावसाळी वाहिन्या टाकण्यात आल्या, त्यासाठी किती खर्च झाला आणि प्रति किलोमीटर खर्च किती झाला, याची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नाला "माहिती व्यापक स्वरूपाची असून संकलित केली जात आहे," असे उत्तर देण्यात आले. साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय कारभारातील मूलभूत आकडेवारीच उपलब्ध नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### प्रशासनाकडेच मूलभूत माहिती नाही

» महापालिकेच्या प्रशासकीय काळात शहरात किती किलोमीटर नवीन ड्रेनेज आणि पावसाळी वाहिन्या टाकण्यात आल्या, त्यासाठी किती खर्च झाला आणि प्रति किलोमीटर खर्च किती झाला, याची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नाला "माहिती व्यापक स्वरूपाची असून संकलित केली जात आहे," असे उत्तर देण्यात आले. साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय कारभारातील मूलभूत आकडेवारीच उपलब्ध नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### यंदाही ५५७ कोटींची तरतूद

» महापालिकेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात मलनिस्सारण विभागासाठी ५३०.९२ कोटी रुपये, तर पावसाळी वाहिन्यांच्या कामांसाठी २६.३० कोटी रुपये अशी एकूण ५५७.२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. निवडणुकांनंतर या विभागाला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. मात्र यापूर्वीच्या खर्चाचा तपशीलच उपलब्ध नसताना नव्या निधीच्या खर्चावर प्रभावी देखरेख आणि पारदर्शक हिशेब ठेवला जाईल का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जूनची मुदतही हुकली! आता कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी दिली नवी डेडलाइन

## महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांचा जूनअखेर रस्ता खुला करण्याचा दावा फोल; पावसाळ्यात रस्त्याची झाली दुरवस्था.

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाबाबत महापालिका प्रशासनाने दिलेले आणखी एक आश्वासन हवेत विरल्याचे स्पष्ट झाले आहे. या रस्त्याचे भूसंपादनाचे काम मेअखेर पूर्ण होईल, तसेच जूनअखेर प्रत्यक्ष रस्त्याचे काम पूर्ण करून नागरिकांसाठी मार्ग खुला करण्यात येईल, असा दावा महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मार्च महिन्यात अंदाजपत्रक सादर केल्यानंतर केला होता. मात्र, जुलैचा मध्य उलटूनही काही मिळकतींचे भूसंपादन रखडले असून,



ताब्यात आलेल्या जागांवरही रस्त्याचे काम अर्धवटच आहे. त्यातच पावसाळ्यात या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. आता प्रशासनाने जूनऐवजी थेट मार्च महिन्यापर्यंतची नवी मुदत जाहीर केली आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षे वाहतूक कोंडी, धूळ, खड्डे आणि संथ कामाचा त्रास सहन करणाऱ्या नागरिकांच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच पडली आहे.

यापूर्वी दिलेल्या मुदती का पाळल्या गेल्या नाहीत, याचे कोणतेही समाधानकारक उत्तर प्रशासनाकडे नसल्याने नागरिकांचा महापालिकेवरील विश्वास उडू लागला आहे. शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या कात्रज ते खडी मशिन चौक या सुमारे साडेतीन कि.मी.च्या रस्त्याचे रुंदीकरण २०१७ मध्ये सुरू झाले. सुरुवातीला ८४ मीटर रुंदीचा रस्ता करण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, भूसंपादनातील अडथळे, नियोजनातील त्रुटी आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रकल्प वर्षानुवर्षे रखडला. अखेर महापालिकेला ८४ मीटरऐवजी पहिल्या टप्प्यात ५० मीटर रुंदीकरण करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

### भूसंपादनही अर्धवटच

» या टप्प्यासाठी आवश्यक १०९ मिळकतींपैकी ८४ मिळकती ताब्यात आल्याचा दावा प्रशासनाने केला असला, तरी उर्वरित २५ मिळकतींचे भूसंपादन अद्याप पूर्ण झालेले नाही. टीडीआर आणि एफएसआयद्वारे भूसंपादन करताना आलेल्या तांत्रिक अडचणी, जागामालकांची रोख मोबदल्याची मागणी आणि धोरणातील बदल यामुळे प्रकल्पाची गती वारंवार मंदावली. आता एप्रिलपासून भूसंपादनाला वेग आल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यावरील कामाची गती नागरिकांना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

# पुण्यात वीजचोरांना महावितरणचा मोठा दणका! 1281 जणांना तब्बल 81 लाखांचा दंड

## महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांच्या आदेशानंतर पुणे परिमंडलात मोठी कारवाई; 15 दिवसांत 1281 वीजचोर रंगेहाथ पकडले.

**पुणे | प्रतिनिधी**

वीजचोरीविरुद्ध महावितरणने पुणे परिमंडलात अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, संपूर्ण परिमंडलात मागील १५ दिवसांत राबविलेल्या धडक मोहिमेत तब्बल १२८१ वीजचोरांना रंगेहाथ पकडले आहे. या वीजचोरांनी एकूण ३ लाख ४० हजार ७३० युनिट वीजचोरी केल्याचे उघड झाले असून, त्यांना ८१ लाख ५५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंड न भरणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याने वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांनी नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीत वीजचोरांवर धडक मोहीम राबवून कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी संपूर्ण परिमंडलात धडक मोहीम राबविली. भारतीय विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १३५ व १३८ अन्वये मीटरमध्ये फेरफार करणे किंवा थेट आकडा टाकून वीजचोरी करणाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली, तर विजेचा गैरवापर करणाऱ्यांवर कलम १२६ अंतर्गत कारवाई झाली.

या मोहिमेत रास्तापेठ शहर मंडलात अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली ३७५ ठिकाणी वीजचोरी पकडून २३ लाख ३० हजार ८८० रुपये दंड वसूल केला. पुणे ग्रामीण मंडलात अधीक्षक अभियंता सुरेश सवाईराम यांनी ५८० वीजचोरांवर कारवाई करून २९ लाख ८२ हजार ६६० रुपये दंड ठोठावला. गणेशखिंड शहर मंडलात अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांच्या पथकाने ३२६ वीजचोरांना २८ लाख ४२ हजार १९० रुपयांचा दणका दिला.

वीज ही राष्ट्रीय संपत्ती असून, त्याची चोरी करणे हा दंड आणि कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला गंभीर गुन्हा आहे. अशा अनधिकृत कृत्यांमुळे जीवितहानीचा धोकाही संभवतो. त्यामुळे नागरिकांनी केवळ अधिकृत वीजजोडणी घेऊनच वीज वापरावी, असे आवाहन मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी केले आहे.



### १५ दिवसांत १,२८१ वीजचोरांवर कारवाई

» महावितरणने पुणे परिमंडलात राबविलेल्या विशेष मोहिमेत अवघ्या १५ दिवसांत १,२८१ वीजचोरांना पकडले. या कारवाईत ३ लाख ४० हजार ७३० युनिट वीजचोरी उघडकीस आली. संबंधितांना एकूण ८१ लाख ५५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. दंडाची रक्कम न भरल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. वीजचोरी रोखण्यासाठी महावितरणने पुढेही अशाच धडक मोहिमा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

### तीन मंडलांत मोठी कारवाई

» रास्तापेठ शहर मंडलात ३७५ प्रकरणे उघडकीस येत २३.३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. पुणे ग्रामीण मंडलात ५८० वीजचोरांवर कारवाई करून २९.८२ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. गणेशखिंड शहर मंडलात ३२६ प्रकरणांमध्ये २८.४२ लाख रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. मुख्य अभियंता सुनील काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंत्यांच्या पथकांनी ही मोहीम यशस्वीपणे राबविली.

### वीजचोरी हा गंभीर गुन्हा

» भारतीय विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १३५ आणि १३८ नुसार मीटरमध्ये फेरफार करणे किंवा थेट आकडा टाकून वीज वापरणे हा दंड आणि कारावासास पात्र गंभीर गुन्हा आहे. तसेच विजेचा अनधिकृत वापर करणाऱ्यांवर कलम १२६ अंतर्गतही कारवाई केली जाते. वीजचोरीमुळे आर्थिक नुकसानाबरोबरच जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी अधिकृत वीजजोडणीद्वारेच वीज वापरावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# 'एचएसआरपी' नंबर प्लेट नसलेल्या दोन हजारांहून अधिक वाहनांवर पुण्यात कारवाई

## प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाद्वारे 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी देण्यात आलेली सहावी मुदत मंगळवारी (३० जून) संपल्यानंतर पहिल्या पंधरा दिवसात (१५ जुलै) पुणे प्रादेशिक परिवहन विभागातील दोन हजार ६८४ वाहनांवर कारवाई करण्यात आली.

प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाद्वारे 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. मोटार वाहन कायद्यानुसार 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांवर एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात येतो. त्याशिवाय 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांचे हस्तांतर, कर्जबोजा चढविणे-उतरविणे, वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे, परवाना नूतनीकरण इत्यादी कामे थांबविण्यात आली आहेत. 'एचएसआरपी' बसविण्यासाठी ३० जूनपूर्वी अर्ज केलेल्या वाहनांवर ही कारवाई करण्यात येणार नाही, अशी माहिती प्रादेशिक परिवहन विभागाकडून निवेदनाद्वारे देण्यात आली आहे.

आतापर्यंत पुणे प्रादेशिक परिवहन विभागातील नऊ लाख ५६ हजार ३४७ गाड्यांना 'एचएसआरपी' पाटी बसविण्यात आली असून, ११ लाख ६९ हजार ०२३ वाहनधारकांनी 'एचएसआरपी'साठी अर्ज केले आहेत. त्यातील ११ लाख ६३ हजार ३३३ वाहनधारकांना अपॉईन्टमेंट मिळाली आहे. पुणे विभागात सुमारे २४ लाख २८ हजार गाड्यांना 'एचएसआरपी' पाटी बसवणे बंधनकारक होते. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना 'एचएसआरपी' लावणे बंधनकारक आहे. त्यानंतर आलेली आणि सध्या येत असलेली नवी वाहने 'एचएसआरपी' लावूनच रस्त्यावर येत आहेत.




### 'एचएसआरपी' का गरजेची?

» एचएसआरपी अॅल्युमिनियमपासून बनवली जाते. या पाटीच्या डाव्या कोपऱ्यात युनिक लेसरने कोरलेला १० अंकी क्रमांक असतो. पाटीवर एक होलोग्राम देण्यात आला असून, त्यावर वाहनाची तपशीलवार माहिती असते. रात्रीच्या वेळी वाहन क्रमांक पाटी व्यवस्थित दिसावी म्हणून रेट्रो-रिफ्लेक्टिव्ह फिल्म असते. या पाटीमुळे बनावट वाहन क्रमांकाची पाटी, फॅन्सी पाटी, वाहन क्रमांकाची खाडाखोड इत्यादी गोष्टी करता येत नाहीत. या पाटीमुळे चोरीला गेलेले वाहन शोधण्यास मदत होते.